30 MAR 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कमकुवत कॉलेजना विद्यापीठाचा आधार

कोल्हापूर टाइम्स टीम



**विद्यापीठाचे सात कॉलेजना ११ लाखांचे अर्थसाह्य**

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षांतर्गत राबवण्यात आलेल्या कमकुवत महाविद्यालय अर्थसहाय्य योजनेसाठी विद्यापीठ क्षेत्रातील सात महाविद्यालये पात्र ठरली आहेत. या महाविद्यालयांना २०१६-१७ शैक्षणिक वर्षासाठी ११ लाख २५ हजार रुपयांचे अर्थसाह्य देण्यात आले. निधीचे धनादेश कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याहस्ते महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडे सुपूर्द करण्यात आले. या निधीतून पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.

विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात अनेक नाविन्यपूर्ण योजना सुरू करण्यात आल्या. त्यात 'कमकुवत महाविद्यालयांना अर्थसहाय्य देण्याची योजने'चा समावेश होता. विद्यापीठाशी संलग्न कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचा विचार निधीसाठी केला जातो. कायम विनाअनुदानित महाविद्यालयांना सरकार अथवा विद्यापीठ अनुदान आयोगाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नाही. तसेच ही महाविद्यालये पारंपरिक विद्याशाखांची असतील तर त्यांना शुल्काच्या माध्यमातून अत्यल्प अर्थसाह्य प्राप्त होते. त्यामुळे ही महाविद्यालये इतर महाविद्यालयांच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या कमकुवत राहतात. विद्यापीठाच्या कामकाजात होत असलेला संगणकीकरणाचा वापर, भविष्यात त्यात होणारी प्रगती या बाबी विचारात घेऊन सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाही संगणकाद्वारे विद्यापीठाशी जोडल्या जाणार आहेत. अनेक विनाअनुदानित पारंपरिक महाविद्यालयांत संगणक, इंटरनेट, फॅक्स मशिन अशा मुलभूत सुविधांचा अभाव असल्याने इतर महाविद्यालयाप्रमाणे सक्षम बनविण्यासाठी विद्यापीठाने २०१२-१३ पासून अर्थसहाय्य देण्याची योजना सुरू केली आहे.

या योजनेनुसार महिला महाविद्यालय, कसबा बीड, कोल्हापूर, भीमराव शिंदे महिला महाविद्यालय, वाई, कला व वाणिज्य महाविद्यालय, डंडाळे, शंकरराव जगताप आर्टस अँड कॉमर्स कॉलेज, वाघोली, म्हैसाळ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, म्हैसाळ व राजेंद्र महाविद्यालय, खंडाळा या सात महाविद्यालयांना ११ लाख २५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते प्र. प्रचार्या डॉ. प्रतिभा पाटणे, प्राचार्य बी. एस. लोखंडे, प्र. प्राचार्य डॉ. एन. आर. गवळी, प्र. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, एस. एस. भोसले यांच्याकडे निधीचे धनादेश देण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 MAR 2017
पुढारी

# निवृत्त प्रा. मोरे यांच्याकडून विद्यापीठास एक लाखाचा निधी

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** येथील शहाजी महाविद्यालयातील निवृत्त प्राध्यापक के.एम. मोरे व सौ. कुंदा मोरे यांनी आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांचा निधी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपूर्द केला. या रकमेच्या व्याजातून एम.ए. राज्यशास्त्र विषयात विद्यापीठात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यात यावे, अशी इच्छा प्रा. मोरे यांनी व्यक्त केली. प्रा. मोरे मूळचे उरूण- इस्लामपूर येथील आहेत. या प्रसंगी इंग्रजी अधिविभागाचे प्रा. एम.एल. जाधव, उपकुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क अधिकारी
3 0 MAR 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठास प्रा. मोरे यांच्याकडून एक लाखाचा निधी

**कोल्हापूर :** शहाजी महाविद्यालयातील निवृत्त प्राध्यापक के. एम. मोरे व कुंदा मोरे यांनी आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांचा निधी शिवाजी विद्यापीठाकडे सुपूर्द केला. विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी धनादेश स्वीकारला.

प्रा. मोरे यांचे वडील महादेव मोरे व आई तानूबाई मोरे अशिक्षित होते; तरीही त्यांनी आपल्या कुटुंबातील मुलांबरोबरच गावातील अन्य मुलांनाही शिक्षण घेण्यासाठी प्रेरित केले. त्यांच्या या शिक्षणविषयक तळमळीच्या स्मृती चिरंतन राखण्यासाठी विद्यापीठास निधी देण्याचा निर्णय घेतल्याचे प्रा. मोरे यांनी सांगितले.

3 0 MAR 2017

पुढारी

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात रोजगार मिळावेत

## देवांग मेहता स्मृती व्याख्यानमालेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नॅसकॉम आणि देवांग मेहता फाऊंडेशन ट्रस्ट यांच्या वतीने कोल्हापुरात प्रथमच व्याख्यानमाला आणि पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला. ही अत्यंत महत्त्वाची बाब असून त्यांनी पुढाकार घेतल्यास विभागातील शिक्षण आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रांतील दरी सांधली जाईल. त्याचप्रमाणे स्थानिक विद्यार्थ्यांनाही माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नवनवीन संधीची माहिती प्राप्त होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे केले.

नॅसकॉम, देवांग मेहता फाऊंडेशन ट्रस्ट आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने देवांग मेहता स्मृती व्याख्यानमाला आणि कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आपल्या कार्यक्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने शैक्षणिक कार्य चालविले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही देश-विदेशांत आमचे अनेक विद्यार्थी विविध पदांवर कार्यरत आहेत. आता नॅसकॉम आणि देवांग मेहता ट्रस्टच्या सहकार्याने या विभागातही माहिती तंत्रज्ञान व त्याआधारित सेवा पुरवठादार कंपन्या येतील आणि त्यात स्थानिक कुशल व तज्ज्ञ युवकांना रोजगार उपलब्ध होतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी देवांग मेहता फाऊंडेशन ट्रस्टचे ट्रस्टी पी. श्रीगणेश म्हणाले, देवांग मेहता हे नव्वदच्या दशकातले एक द्रष्टे व्यक्तिमत्त्व होते. भारत ही माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात महाशक्ती बनेल, असे भाकीत त्यांनी त्या काळातच वर्तविले होते. माहिती तंत्रज्ञानाचे लाभ या देशातल्या अंतिम घटकापर्यंत पोहोचविण्याचे त्यांचे स्वप्न होते. म्हणूनच एकविसाव्या शतकातील भारताच्या गरजा अधोरेखित करताना त्यांनी रोटी, कपडा, मकान बिजली अशी घोषणा दिली होती.

यावेळी नॅसकॉमचे विभागीय प्रमुख डॉ. चेतन सामंत यांनीही या विभागातील विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नवनवीन रोजगार संधी उपलब्ध करण्याचे नॅसकॉमचे प्रयत्न राहतील, अशी ग्वाही दिली. या वेळी शेल्टर असोसिएट्सच्या अध्यक्ष डॉ. लताताई श्रीखंडे यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्यानंतर वरिष्ठ जीआयएस विश्लेषक प्रदीप वझे, चेंदिल कुमार आणि डॉ. भूषण केळकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात विद्यापीठाशी संलग्नित १८ अभियांत्रिकी महाविद्यालयांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.